महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची पदे भरण्यासाठी
स्वतंत्र निवड मंडळ

---

संदर्भ :

१. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.आरटीआर-१०९१/प्र.क्र.२२६/सेवा-३, दिनांक ३० ऑक्टोबर, २०००
२. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/४५८/प्र.क्र.३७५/०७/सेवा-३, दिनांक २१ मे, २००९
३. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/प्र.क्र.३७५/सेवा-३, दिनांक १० जून, २००९
४. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७/सेवा-३(नि.मं.), दिनांक ०२ नोव्हेंबर, २०११
५. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दिनांक १४ डिसेंबर, २०११
६. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/७८९/सेवा-३, दिनांक १८ जुलै, २०१३
७. शासनपत्र सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. म.वै.अ-१११३/७८९/४४५/१३/सेवा-३, दिनांक २७ सप्टेंबर २०१३
८. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.म.वै.अ.-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा-३, दिनांक ३ ऑक्टोबर २०१३

---

-

जाहिरात क्रमांक : ०२ /२०२१ नस्ती क्रमांक : मवैअ-२०१५/प्र.क्र.४३१/सेवा-३

---

वैद्यकीय अधिकारी, गट-अ (सातवा वेतन आयोग वेतनस्तर, एस-२०:- रु. ५६,१००-१,७७,५००) सवंर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे .

१. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-"अ" या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरतीकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत .

२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-"अ" या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी **http://arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर अर्जाबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात

आली आहे. त्यानुसार https://www.maha-arogya.in/application_form.aspx या संकेतस्थळावरून सदर अर्ज पूर्ण पणे ONLINE पद्धतीने भरावयाचे आहेत.

३. उमेदवारांनी ONLINE अर्जासोबत खाली नमूद केलेल्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्व-स्वाक्षांकीत प्रती UPLOAD करणे आवश्यक आहे. अन्यथा आपला अर्ज स्वीकारला जाणार नाही.

१. जन्म प्रमाणपत्र किंवा जन्म तारखेसाठी ग्राह्य धरण्यात येणारे प्रमाणपत्र (School leaving)

२. महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र

३. राखीव प्रवर्गातून अर्ज केल्यास जात व जात वैधता प्रमाणपत्र

४. राखीव प्रवर्गातून अर्ज केल्यास शासकीय नियमानुसार आवश्यक असलेले वैध Non-Creamy-Layer प्रमाणपत्र.

५. ८.३ नुसार आंतरवासिता (Internship) पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र

६. अर्जाच्या दिनांकास वैध असलेले महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडील (MMC) नोंदणी प्रमाणपत्र /Renual receipt

७. ९ (२) नुसार अनुभव प्रमाणपत्र. - सोबत जोडलेल्या नमुन्यात.

८. स्वतःचा पासपोर्ट साईजचा फोटो ( JPEG file ) ( २ MB पेक्षा जास्त नसावी. )

९. स्वस्वाक्षरीचा नमुना ( JPEG file ) ( २ MB पेक्षा जास्त नसावी. )

१०. महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र ) नियम २००५ नुसार- सोबत जोडलेल्या नमुन्यात.

११. परदेशातुन एमबीबीएस पदवी घेतलेल्या उमेदवाराची NBE गुणपत्रिका . .

१२. एमबीबीएस पदवी घेतलेल्या उमेदवाराची चार वर्षाची गुणपत्रिका

१३. दिव्यांग प्रमाणपत्र (Online certificate ) ( दिव्यांग असल्यास )

१४. (खेळाडू प्रवर्गातून अर्ज करीत असल्यास) आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूचे प्रमाणपत्र तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्र. राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियूसे-२, दिनांक १जुलै २०१६ मधील सर्वसाधारण अर्हतामधील मुद्दा क. ४ ( V) नुसार अर्जासोबत विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

** All other PDF files except sr no. ८& ९ above should not be more than ५ MB each.

४. **पदसंख्या : सध्या एकुण रिक्त असलेली पदे :-**

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे **११५२** पदांसाठी (सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेता ) सदर स्वतंत्र जाहीरात देण्यात येत असुन त्यासाठी नव्याने उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

(महत्वाचे - १. या आधीच्या १.४.२०२१ रोजी च्या जाहिरातीस अनुसरून ज्यांनी पदस्थापना घेतली आहे अशा वैद्यकीय अधिकारी यांनी पुन्हा अर्ज करू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते रद्दबादल ठरविण्यात येतील.

२. या आधीच्या १.४.२०२१ रोजी च्या जाहिरातीमध्ये प्राप्त अर्जांचा या जाहिराती साठी विचार केला जाणार नाही.

३. जे वैद्यकीय अधिकारी अनधिकृत गैरहजर आहेत अथवा ज्या अनधीकृत गैरहजर अधिका-यांना शासनाने एक संधी म्हणून पुन्हा पदस्थापना दिलेली आहे परंतु त्या ठिकाणी असे वैद्यकीय अधिकारी रुजू न झाल्यास व त्यांनी या प्रक्रियेत अर्ज केल्याचे कोणत्याही टप्यात निदर्शनास आल्यास त्यांचा अर्ज तत्काळ रद्दबादल करण्यात येईल. तसेच त्यांनी सदर माहिती लपवून नियुक्ती आदेश घेतल्यास व तद्नंतर सदर बाब उघडकीस आल्यास त्यांच्या नवनियुक्त सेवा तत्काळ समाप्त करण्यात येतील.

४. ज्या वैद्यकीय अधिकारी यांनी या पूर्वी शासना मार्फत अथवा जिल्हाधिका-यां मार्फत नियमित वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक आदेश घेतले आहेत व नंतर कोणत्याही कारणास्तव राजीनामा सादर केला आहे अशा वैद्यकीय अधिका-यांचे राजीमाने मंजूर झालेले असल्याचे शासन आदेश निर्गमित झाले नसतील तर त्यांचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. सदर बाब निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यात निर्दशनास आल्यास त्यांचा अर्ज तात्काळ रद्दबादल करण्यात येईल. तसेच त्यांनी सदर माहिती लपवून नियुक्ती आदेश घेतल्यास व तद्नंतर सदर बाब उघडकीस आल्यास त्यांच्या नवनियुक्त सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील.

सदर पदभरतीप्रक्रियेस खालीलप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षण राहील :-

| प्रवर्ग | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | इडब्लुएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ५४ | ३१ | १४ | १४ | १५ | ९ | ४३ | २२६ | ११५ | ६३१ | ११५२ |
| सदर पदांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३५ | २० | ९ | ९ | ११ | ५ | २८ | १४८ | ७५ | ४०४ | ७४४ |
| महिला ३०% | १६ | ९ | ५ | ४ | ४ | ३ | १३ | ६७ | ३५ | १८९ | ३४५ |
| खेळाडु (५ % ) | ३ | २ | -- | १ | -- | १ | २ | ११ | ५ | ३२ | ५७ |
| अनाथ (एकुण खुल्या पदांच्या १ %) | | | | | | | | | | ६ | ६ |
| दिव्यांग (४ % ) | ४६* | | | | | | | | | | |

- **- जाहिरातीत नमूद पदांच्या संख्येत वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे, सदर अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवेले आहेत.**

{टिप:- उपरोक्त तक्त्यात दिव्यांगासाठी ४६ पदे राखीव येत असुन ती पदे सा.आ.वि., शा.नि. क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०३/सम-२, दि.१७.०६.२०२१ मधील तरतुदीनुसार अस्थीव्यंग (एका पायाने अपंग (५० %)) या संवर्गातील

व्यक्तींसाठी आरक्षीत ठेवण्यात येत आहेत. तसेच * उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात दिव्यांगाचे ते पद दर्शविण्यात येईल.}

{वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) साठी राखीव पदे आंतरपरिवर्तनीय असून वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) चे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर शासन आदेशानुसार सदर पदे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) मधून आंतरपरिवर्तनीय नियमानुसार भरण्यात येतील}

- मागासवर्ग, खेळाडू व दिव्यांग यांचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.१) जाहीर करण्यात आल्यानुसार **११५२** पदांवर खालील नमूद विशेषज्ञ शाखेतील पदव्युत्तर पदविका / पदवीधारक उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात येईल:-

१) अतिविशेषोपचार तज्ञ
२) बालरोग तज्ञ
३) भिषक
४) भूल तज्ञ
५) स्त्रीरोग तज्ञ
६) शल्य चिकित्सक
७) कान नाक घसा तज्ञ
८) नेत्ररोग तज्ञ
९) अस्थीव्यंगोपचार तज्ञ
१०) त्वचारोग तज्ञ
११) शरीरविकृती तज्ञ
१२) रक्तसंक्रमण अधिकारी
१३) क्ष-किरण तज्ञ
१४) मानसोपचार तज्ञ
१५) पी.एस.एम.

४.२) उपरोक्त ४.१ मध्ये नमुद विषयांव्यतिरिक्त इतर विषयातील पदवी किंवा पदविका किंवा समकक्ष प्रमाणपत्रे धारण केलेल्या उमेदवारांची गणना निव्वळ MBBS उमेदवार म्हणून करण्यात येईल व त्यांची नियुक्ती प्राधान्याने प्राथमिक आरोग्य केंद्रे व प्राथमिक आरोग्य पथके येथे करण्यात येईल. तसेच त्यांना ३ / ६ अतिरिक्त वेतन वाढी लागू राहणार नाहीत.

४.३) विशेषज्ञ उमेदवारांना ३/६ वेतन वाढी लागू असल्याने त्यांची पदस्थापना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व आरोग्य संस्थेच्या आकृतीबंधानुसारच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

**<u>५.</u>** **<u>दिव्यांगासाठीचे आरक्षण</u>** : सा.आ.वि., शा.नि. क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०३/सम-२, दि.१७.०६.२०२१ मधील तरतुदीनुसार दिव्यांग उमेदवारामधील फक्त अस्थिव्यंग (एका पायाने अपंग (५० %)) उमेदवारच सदर पदासाठी

पात्र असून जो उमेदवार अश्या प्रकारच्या दिव्यांग स्पष्टपणे नमूद केलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे ONLINE पद्धतीने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करेल त्याच उमेदवाराचा सदर भरती प्रक्रियेत विचार होईल . दिव्यांगांसाठीचे आरक्षण निश्चीत करतांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.१४४/१६अ , दि.२९.०५.२०१९ मधील तरतुदी अवलंबविण्यात आल्या आहेत.

६. <u>वेतनश्रेणी</u> : सातवा वेतन आयोग (वेतनस्तर, एस-२० रु.५६१००-१७७५००) नुसार वेतन अनुज्ञेय राहील शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दिनांक १४ डिसेंबर, २०११ अन्वये पदव्युत्तर पदविका धारक उमेदवारांना ३ अतिरिक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना ६ अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील. तथापि, पदव्युत्तर व पदवी धारक उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व आरोग्य संस्थेच्या आकृतीबंधानुसार पदस्थापना देण्यात येईल व तेव्हांच त्यांना अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील.

<u>७. वय:</u>

७.१ **दिनांक ९ ऑगस्ट, २०२१** रोजी प्रचलित नियमानुसार ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे, मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत नियमाप्रमाणे शिथीलक्षम.

८. <u>शैक्षणिक अर्हता :</u>

८.१ **वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) पदासाठी:** सांविधानिक विद्यापिठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेली समान अर्हता ;

८.२ **वैद्यकीय अधिकारी ( विशेषज्ञ) पदासाठी :** सांविधानिक विद्यापीठाची (४.१) येथिल नमूद अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदवी/पदविका किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेल्या समान अर्हतेची पदव्युत्तर पदवी किंवा पदविका.

८.३ **दि.९ ऑगस्ट , २०२१** या दिनांकापूर्वी अथवा दिनांकास आंतरवासिता (Internship) पूर्ण असणारे उमेदवारच पात्र ठरतील. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत UPLOAD न केल्यास अर्ज रद्दबादल ठरविण्यात येईल.

८.४ **भारता बाहेर वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या उमेदवारांसाठी भारताची NBE परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य राहील. तसेच अर्जांच्या छाननी साठी त्याचे NBE परीक्षेतील प्राप्त गुणच विचारात घेतले जातील. NBE परीक्षेचे गुण पत्रक अर्जासोबत न जोडल्यास त्यांचा अर्ज रद्दबादल ठरविण्यात येईल.**

८.५ **उपरोक्त ८.१ येथिल नमूद शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांव्यतिरिक्त अन्य शैक्षणिक अर्हता धारकाचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**

८.६ **दिनांक ९ ऑगस्ट , २०२१ सकाळी १०.०० पासून दिनांक २१ ऑगस्ट २०२१ रात्री ११.५९ वाजे पर्यंत ONLINE अर्ज भरता येईल.**

. ९. <u>निवड प्रक्रिया :-</u>

१. काही विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदवी / पदविके साठी गुणां ऐवजी GRADATION देण्यात येत असल्याने त्यांच्या गुणांबाबत निश्चितता ठरविता येत नाही व त्यामुळे गुणानुक्रम लावण्यास अडचण होते. सबब प्राप्त अर्जाची छाननी तसेच अंतिम गुणवत्ता यादी उमेदवारांच्या निव्वळ MBBS च्या गुणांवर व अनुभवावर आधारित करण्यात येइल, यात

I. MBBS पदवी परीक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुणांचे ९५ टक्क्यात परिवर्तन करण्यात येईल. ( भारता बाहेर वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या उमेदवारांसाठी NBE परीक्षेतील प्राप्त गुणच विचारात घेतले जातील)

II. अनुभवाचे गुण देण्यासाठी एकूण सेवा विचारात घेताना प्रत्येक वर्षाकरिता १ गुण याप्रमाणे गुण देण्यात येतील. परंतु अनुभवाचे गुण जास्तीत जास्त ५ इतके राहतील.

२. अनुभवासाठी पुढील संस्थां मध्ये केलेली सेवा गुणांसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

i. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील संस्था मध्ये केलेली कंत्राटी व बंधपत्रित सेवा.

ii. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागातील संस्था मध्ये केलेली कंत्राटी व बंधपत्रित सेवा. (Senior अथवा Junior Resident). परंतु पद्व्युत्तर पदवी अथवा पदविकेचे शिक्षण घेताना बंधनकारक असलेली Resident म्हणून केलेली सेवा गुणांसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. तथापि, Post Graduation झाल्यानंतर जर अशी सेवा दिली असेल तर, ती ग्राह्य धरण्यात येईल.

iii. केंद्र शासनाच्या सेवा.

iv. केंद्र / राज्य शासन अंकित संस्था मधील सेवा.

v. महापालिकांमधील सेवा.

vi. महाराष्ट्र शासना शिवाय इतर राज्यातील शासकीय सेवा ( Experience certificate should be in English)

<u>**उपरोक्त सेवांव्यतिरिक्त इतर खाजगी संस्था मधील सेवा अनुभवासाठी व गुणांसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.**</u>

<u>**एकूण १०० गुण**</u>

| **तपशिल** | **एमबीबीएस शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण** (Weightage) |
|---|---|
| पदवी परीक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुणांचे ९५ टक्क्यात परिवर्तन करण्यात येईल | (जास्तीत जास्त ९५ गुण) |
| उपरोक्त २ मध्ये दर्शिविलेल्या सेवां करीता अनुभवाचे गुण | प्रत्येक वर्षासाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण.) |
| **एकूण गुण** | १०० |

३. पदव्युत्तर पदवी / पदविका धारक व पदवी धारक उमदेवारांचा अनुक्रमे विशेषज्ञ निहाय व निव्वळ MBBS नुसार स्वतंत्र गुणानुक्रम लावण्यात येईल.

यात विशेषज्ञांसाठी खालील क्रम विचारात घेण्यात येईल.

I. अतिविशेषोपचार तज्ञ

II. पदव्युत्तर पदवी (MD/MS)

III. DNB

IV. मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवीका (University Diploma)

V. FCPS

VI. CPS पदव्युत्तर पदवीका

**टिप :-**

१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी गट-अ ( सातवा वेतन आयोग वेतनस्तर, एस-२० रु.५६१००-१७७५०० ) या संवर्गात कार्यरत असणारे नियमीत वैद्यकीय अधिकारी अर्ज करण्यास पात्र नाहीत व सदरचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. सदर बाब लपवून अर्ज केलेला कोणत्याही टप्यावर आढळल्यास त्यांना प्रक्रियेतून बाद करण्यात येऊन त्यांच्यावर नियमानुसार शिस्त भंगाची कारवाई करण्यात येईल.

२) अनुभवाचे गुण देताना प्रत्येक वर्षासाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण देण्यात येतील. परंतु १ वर्ष पेक्षा कमी सेवेसाठी गुण देण्यात येणार नाहीत.

३) उमेदवाराने विहित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित संस्था/ कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

४) अनुभवासाठीच्या गुणांच्या मूल्यांकनासाठी **३१ जुलै, २०२१** हा अंतिम दिनांक राहील.

५) निवड प्रक्रियेसाठी विहित करण्यांत आलेल्या निकषानुसार गुणांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके/ प्रमाणपत्रे यांच्या स्व-साक्षांकीत प्रती उमेदवाराने अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होईल.

६) उमेदवाराकडे अर्ज करण्याच्या दिनाकास महाराष्ट्राचे वैध अधिवास (DOMICILE) प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. तसेच सदर प्रमाणपत्र अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होईल.

७) उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अर्ज करण्याच्या दिनाकास वैध MMC प्रमाणपत्र / Renewal Receipt असणे अनिवार्य आहे. तसेच सदर प्रमाणपत्र अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होईल.

८) शासकीय नियमानुसार लागू असलेल्या राखीव प्रवर्गातुन अर्ज करणा-या उमेदवाराकडे अर्ज करण्याच्या दिनाकास जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र व वैध नॉन क्रिमिलेअर (NCL) प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. तसेच सदर प्रमाणपत्र अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल करण्यांत येईल.

९) प्राप्त अर्जाची छाननी करुन विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी https://www.maha-arogya.in/common_dashbord.aspx संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१०) केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्तीच्या ठिकाणचा पसंतीक्रम दर्शविण्याकरीता मूळ प्रमाणपत्रांसह (छायांकीत प्रती चालणार नाहीत) समुपदेशनाकरीता व्यक्तीशः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तथापि खाली नमूद कारणांसाठी उमेदवाराने प्राधीकारपत्र दिलेल्या व्यक्तीस समुपदेशनासाठी उपस्थित राहता येईल. परंतु अशा प्रकरणी प्राधिकृत व्यक्तीने घेतलेल्या निर्णयानुसार शासन स्तरावरून निर्गमित करण्यात येणा-या आदेशात त्यानंतर कोणताही बदल करता येणार नाही.

i. उमेदवार स्वतः COVID +ve असल्यास. (प्राधिकृत व्यक्तीसोबत उमेदवाराचा ४८ तासातील COVID-१९ RTPCR अहवाल असणे आवश्यक राहील)

ii. गर्भवती स्त्री उमेदवार ज्यांना प्रवास करण्यास अनुमती नाही. (परंतु या साठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किंवा त्यांनी Counter Sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

iii. उमेदवार स्वतः आंतररुग्ण म्हणून रुग्णालयात दाखल असेल तर. (परंतु या साठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किंवा त्यांनी Counter Sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

११) समुपदेशनाच्या दिवशी व नमुद वेळेत उमेदवार अथवा उपरोक्त (१०) नुसार प्रतिनिधी उपस्थित न राहील्यास नियुक्तीसाठी त्यांची निवड केली जाणार नाही व त्यांना त्याबाबतचा कोणताही हक्क् सांगता येणार नाही.

१२) मूळ प्रमाणपत्रे शैक्षणिक कारणास्तव एखाद्या संस्थेत जमा असल्यास त्या संस्था प्रमुखाचे सही शिक्यासह अर्जाच्या दिनांकाचे दिवशीचे मूळ प्रमाणपत्रे त्या संस्थेत जमा असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा समुपदेशन प्रक्रियेतून त्या उमेदवारास बाद करण्यात येईल.

१३) आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत सादर करण्यात येणारी गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीचा पसंतीक्रम याची तपासणी करुन उमेदवारास नियुक्ती आदेश शासनाकडून समुपदेशनाच्या दिवशीच देण्यात येतील.

१४) नियुक्ती आदेशानंतर विहित मुदतीत संबंधित वैद्यकीय अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर त्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात येईल.

१५) विहित मुदतीत नियुक्तीच्या पदावर रुजू न झालेले उमेदवार त्यांच्या नियुक्तीचा हक्क गमावतील.

१६) नवनियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील. त्यांचे वेतन हे बायोमेट्रीक हजेरीशी संलग्न असेल.

१७) दि. १.०४.२०२१ च्या जाहीरातीस अनुसरुन निवड झालेले उमेदवार प्रस्तुत जाहीरातीस अनुसरुन अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**१०. सर्वसाधारण :**

**१०.१** निवड झालेले उमेदवारांना दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी असेल.

**१०.२** महाराष्ट्र वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट-अ (सातवा वेतन आयोग, वेतनस्तर एस-२३, ६७७००-२०८७००) या पदावर पदोन्नतीकरीता उमेदवारास संधी असून त्याकरीता त्या पदाकरीता आवश्यक असलेल्या अर्हता पूर्ण करणे आवश्यक राहील.

**१०.३** निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.

**१०.४** निवड झालेल्या उमेदवाराने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होतांना संबंधित कार्यालय प्रमुखास "ते किमान ५ वर्षाची शासकीय सेवा करतील किंवा न केल्यास शासनाने वेळोवेळी विहीत केलेली रक्कम दंड म्हणून भरण्यास तयार आहेत" असे बंधपत्र देणे अनिवार्य असेल.

**१०.५ शासन निर्णय दि. १९.०३.२०१९ मधील अटी व शर्ती नुसार सदर उमेदवारास कमीतकमी ३ वर्षाची नियमित सेवा (रजा कालावधी वगळून ) झाल्यशिवाय सेवांतर्गत पद्व्युत्तर प्रशिक्षणासाठी जाता येणार नाही.**

**१०.६ जर निवड होऊन रुजू झालेला उमेदवार उपरोक्त नमूद कालावधी आधी परस्पर पद्व्युत्तर प्रशिक्षणासाठी गेल्यास, त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त कण्यात येतील.**

१०.६ निवड झालेल्या उमेदवाराचे जाहिरातीच्या दिनांकास महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र XLVI, १९६५) नुसार त्याचे/ तिचे नांव नोंद असणे अनिवार्य आहे.

**११. महत्वाचे:**

११.१ उमेदवारानी आवेदनपत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकते बाबत आणि सत्यतेबाबत स्वसांक्षांकित स्वयंप्रमाणपत्र अर्जासोबत UPLOAD करावे. स्वयंप्रमाणित सादर केलेली माहिती खोटी ठरल्यास अर्जदार नियमानुसार कारवाईस पात्र राहिल.

११.२ स्वयंप्रमाणपत्राचा नमुना https://www.maha-arogya.in/application_form.aspxया संकेतस्थळावर उपलब्ध आहे .

११.३ प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे .

१२. अर्ज :-

१२.१ महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-"अ" या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी **http://arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर अर्जाबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार https://www.maha-arogya.in/application_form.aspx या संकेतस्थळावरून जाऊन सदर अर्ज पूर्णपणे ONLINE पद्धतीने भरावयाचे आहेत.

१२.२ उमेदवाराने अर्जाचे शुल्क ONLINE पध्दतीने भरावे.

१२.३ स्वयंप्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज दिनांक ९ ऑगस्ट २०२१ सकाळी १०.०० पासून ते २१.०८.२०२१ रात्री ११.५९ पर्यंत https://www.maha-arogya.in/application_form.aspx या संकेतस्थळावर ONLINE पद्धतीने भरावेत.

१२.४ टपालाने अथवा अन्य मार्गाने आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

१३. शुल्क :-

१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारासाठी - रु. १,५००/-

२. मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी - रु. १,०००/-

३. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.

**स्थळ : मुंबई**

**दिनांक : ९.०८.२०२१**

(वि. ल. लहाने)
**सह सचिव तथा स्वतंत्र निवड मंडळाचे सदस्य सचिव**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**१० वा मजला, संकुल इमारत, गोकुळदास तेजपाल रुग्णालय**
**आवार मुंबई-४००००१**

## SELF DECLARATION

**I do here by solemnly state on oath as under:-**

1. **I have submitted my application for the post of Medical Officer (Group "A") in pursuance of the advertisement NO. 02/2021 dated 9th August 2021.**
2. **I have read the provisions in the rules and Notification of the selection board carefully and I hereby undertake to abide by them. I further declare that I fulfil all the conditions of the eligibility regarding age limits, educational qualification, experience prescribed for the post herein above.**
3. **I hereby declare that the statement made in this application are true complete and correct to the best of my knowledge and belief. In the event of my information being found false or incorrect, I am liable to be dismissed from service.**
4. **I hereby declare that I am not a permanent employee of the Public Health Department.**
5. **If information given in application is found to be false i.e. not supported by documentary proof at the time of verification by selection board, I would be liable to be blacklisted and debarred from all further examination and selection process of the Selection board and liable for disciplinary proceeding, if already in government service.**

Place ;-

Date :- Signature of candidate

(Name of candidate)

(Mobile number)